<u>प्र सि ध्दी    म सू दा</u>

खादी  ग्रामोद्योग आयोग, सुक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय, नवी दिल्ली यांनी संपूर्ण देशात पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम दि. १५-०८-२००८ पासून राबविण्याचे जाहिर केले आहे. राज्यात हा कार्यक्रम ग्रामीण भागात खादी ग्रामोद्योग आयोग, ( राज्य निर्देशक) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ  व शहरी भागामध्ये जिल्हा उद्योग केंद्रा मार्फत कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

१. शहरी व ग्रामीण भागात जिल्हा उद्योग केंद्र व ग्रामीण भागात राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, खादी ग्रामोद्योग आयोगामार्फत राबविण्याचे आहे. ग्रामणीभाग- (अ) जे क्षेत्र महसूल अभिलेख्याव्दारे गांव म्हणून जाहीर केले आहे. (ब) जे क्षेत्र शहर म्हणून वर्गीकृत केले आहे परंतू त्या शहराची लोकसंख्या २०००० पेक्षा कमी आहे.

२. सदरची योजना ही २७ राष्ट्रीयकृत बँका, सर्व ग्रामीण बँका, राज्यस्तरीय टाक्स फोर्स कमिटींनी मायता दिलेल्या सहकारी बँका व खाजगी क्षेत्रातील आसुचित कमर्शियल बँक्स तसेच लघु उद्योग विकास बँक (सीडबी) यांच्या आर्थिक सहाय्यता राबविण्यात येईल.

३. या योजनेत प्रकल्पात गुंतवावयाची प्रकल्प रक्कम ही जास्तीत जास्त २५.०० लक्ष रुपये राहील प्रकल्पामध्ये गुंतवावयाची स्वगुंतवणूक व सेवा उद्योगासाठी अर्थ सहाय्य मर्यादा रु. १०.०० लाखापर्यंतच राहील व उत्पादा क्षेत्रातील उद्योगासाठी रु. २५.०० लाखापर्यंत राहील.

४. द्यावयाची अनुदानाची रक्कम खालील प्रमाणे राहील.

| लाभार्थी वर्गवारी | लाभार्थी स्वगुंतवणूक प्रकल्प राशीच्या | आदाााचा दर प्रकल्पराशीच्या | |
|---|---|---|---|
| क्षेत्र | | शहरी | ग्रामीण |
| सामाय प्रवर्ग | १० टक्के | १५ टक्के | २५ टक्के |
| विशेष (अ.जा. अ.जमाती, इ.मा.प्र., अल्प संख्यांक, स्त्रिया, माजी सैकि, अपंग, अनिवासी भारतीय, डोंगराळ व सिमावर्ती क्षेत्र इ. ) | ०५ टक्के | २५ टक्के | ३५ टक्के |

५.  या योजनेचा लाभ खालील लाभार्थीच घेवू शकतात.

५.१ १८ वर्षे वयावरील वैयक्तीक लाभार्थी

५.२ १८६० च्या ाेंदणी कायद्याासार नोंदणी झालेल्या संस्था.

५.३ धर्मदाय संस्था

५.४ उत्पादक सहकारी संस्था

५.५ उत्पादा प्रकल्प रु. १०.०० लाखाचे वर व व्यवसाय, सेवा प्रकल्प रु. ५.००

**लाखाचे वर असल्यास शैक्षणीक पात्रता किमान ८ वी पास असावी.**

**५.६ केवळ नविन उद्योग उभारणीसाठी या योजनांचा लाभ घेता येईल.**

**५.७ इतर शासकीय योजनांचा आर्थिक लाभ घेतलेल्या स्वयंसहाय्यत गटांना या योजनेचा लाभ घेता येईल.**

**५.८ कोणत्याही उत्पन्न गटातील लाभार्थीना योजनेचा लाभ घेता येईल.**

**५.९ प्रस्थापित युनिट ( की जे उद्योग पीएमआरवाय, आरईजीपी, किंवा इतर राज्य अथवा केंद्र सरकारच्या योजानांचा लाभ घेवून स्थापन झाले आहेत.) आणि राज्य / केंद्र सरकारच्या इतर योजनेतून अनुदानाचा लाभ घेतलेले नसावे.**

**५.१० कुटुंबातील एकच व्यक्ती या योजनेचा लाभ घेवू शकतो.**

**५.११ नकारात्मक यादीमध्ये समावेश असलेले व प्रस्तावित असलेले उद्योग या योजनेसाठी अपात्र.**

**ज्या लाभार्थ्यांना या योजनेत भाग घ्यावयाचा आहे त्यांनी सविस्तर माहितीकरीता व विहित नमुन्यातील अर्जाकरीता जिल्हा उद्योग केंद्र/खादी ग्रामोद्योग मंडळ यांचेशी संपर्क साधावा व योजनेचा लाभ घ्यावा.**

सदर योजनेचा लाभ पात्र लाभार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम कार्यबल समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर डॉ. पी. अन्बलगन यांनी केले आहे.

---

दू.क्र. ०२४१-२३५५३४२ जा.क्र.जिउकेंअ/पंप्ररोयो/प्रसिध्दी/२००८/

फॅक्स ०२४१-२३२६६१५ महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर.

ई-मेलः- dicanr_ngr@dataone.in दिनांक :

didicahmednagar@maharashtra.gov.in